दै. तरुण भारत 22-3-2002

# बॉक्सींग स्पर्धेत कमला महाविद्यालयास दोन सुवर्ण

कोल्हापूर ■ महाराष्ट्र राज्य बॉक्सींग असोसिएशनतर्फे डिसेंबर २००१ मध्ये घेण्यात आलेल्या बॉक्सींग स्पर्धेत येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजने दोन सुवर्ण आणि एक ब्राँझ पदक मिळविले.

या स्पर्धेत कु. रुपाली बब्न सुतार या मुलीने प्लायवेट गटात सुवर्णपदक, कु. ज्योती काटकर हिला पीन वेट गटात सुवर्णपदक तर कु. स्वाती पाटीलने फेदरवेट गटात ब्राँझपदक मिळवले.

या विद्यार्थिनींचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार रंगराव पाटील यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थिनींना प्रा. सुनिता काळे आणि प्रा. साधना पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.